कलम ४ ( 1)(ख ) ( xii)

परिपत्रक क्रं .वैद्य /१३/ कावि/६०९/ २०२२ दि २५ /०७ /२०२२ अन्वये

दि १५/०३/१९९६ रोजी अंध व्यक्तीच्या शिष्टमंडळाने मोफत वैद्यकीय सेवेच्या मागण्याबाबत मा . आयुक्त यांच्या समावेत झालेल्या चर्चमध्ये अंधाबरोबर अस्थी , मुकबधिर , मतिमंद , आश्रम शाळेतील विद्यार्थीनी , गरीब निराधार रुग्ण , भुकंप ग्रस्त अश्या रुग्णांना वैद्यकीय सेवा देताना ४० % रुग्णांना मोफत रुग्णसेवे बाबतच्या सवलती देणेबाबत मान्यता निरस्त करण्यात आली आहे . तथापि बाहय रुग्ण फि माफ करण्यात येऊ नये . आदेश क्रं . वैद्य / ७ / कावि / २३०३ / २००६ दि ०९/११/२००६ अन्वये 1. राष्ट्रीय कार्यक्रमातंर्गत दिले जाणारे उपचार सर्व रुग्णांना अंशतः किंवा पुर्णतः मोफत देण्यात यावेत . 2. मनपा हददीतील रुग्णांना औषधपचारासाठी फी माफी किंवा सवलत देताना वास्तव्याच्या पुरावा म्हणुन रेशनींग कार्ड , लाईटबिल , टेलिफोन , बिल , ओळखपत्र आणि योग्य तो मनपा हददीतील वास्तव्याच्या पुराव्याची सत्यप्रत नस्तीय ठेवावी . परंतु उपचार देताना कोणताही पुरावा मागु नये . 3. मनपा हददीबाहेरील सर्व प्रकाराच्या रुग्णांना मंजुर दरपत्रकापमाणे औषधोपचार , रुग्णसेवा देण्यात यावी . मनपा हददीबाहेरील सर्व प्रकारच्या रुग्णांना फी माफी / सवलत किंवा इतर कसलीही सवलत देता येणार नाही . 4. मनपा अधिकारी / कर्मचारी व पालिकेचे आजी माजी नगरसदस्य व या सर्वांचे कुंटुंब व्याख्येनुसार त्याचेवर अवलंबुन असणा – या व्यक्तींना मोफत उपचार सुविधा देणेत याव्यात . 5. शहरातील द्रारिदरेषेखालील रुग्ण , आपत्कालीन स्थितीतील रुग्ण ( भुकंप , पुरग्रस्त , बेवारस , पत्रकार व वारकारी इ .) ज्येष्ठ नागरीक , स्वतंत्र सैनिक , सेवानिवृत्त कर्मचारी , पत्रकार , वायसीएम रुग्णालय येथे नियुक्तीस येणारे पोलिस कर्मचारी , मानधन वरील व अन्य प्रकारे काम करणारे कर्मचारी ( घंटागाडी , अंगणवाडी , लिव्ह व्हेकन्सी , सी.पी.एस व इंटर्न डॉक्टर्स ) यांना वैद्यकीय सेवा मोफत देण्यात यावे . 6. मनपा हददी बाहेरील असले तरी द्रारिद रेषेखालील ज्येष्ठ नागरीक , स्वतंत्र सैनिक , यांना तसा पुरावा सादर केलेनंतर औषधोपचार रुग्णसेवा देण्याचे मान्यता निरस्त करण्यात आली आहे . पिंपरी चिंचवड मनपा मा . सदस्यांचे शिफारशीचा आधारे रुग्णसेवा बिलामध्ये ५० % अथवा पुर्णतः रक्क्म सवलत / माफीचे / अधिकार मा .**सहा.**आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांना राहील ज्येष्ठ नागरिकांना वय ६० वर्षे व त्यावरील तसेच माजी राज्य स्तरीय खेळाडु , माजी राष्ट्रीय स्तरावरील खेळाडु , माजी सैनिक व मनपा शहरातील मतिमंद , अपंग , मुकबधिर व्यक्तींना पिंपरी चिंचवड मनपाचे रुग्णालय / दवाखान्यात आवश्यक ते पुरावे सादर केलेनंतर विनाशुल्क उपचाराची सवलत देण्यास मान्यता देत आहे . मात्र केसपेपर फी + तपासणी फी माफ असणार नाही . 7.महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजने अंतर्गत येणारे पिवळे/केशरी रेशन कार्ड धारक नागरिक वगळून इतर केशरी रेशन कार्ड धारक नागरिकांना देनेत आलेली मोफत सुविधा आदेश निरस्त करणेत येत आहे .